# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Kumarbharti (Part- 3): Chapter 13- कर्ते सुधारक कर्वे




For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com, 52, Shilpa Nagar, Somalwada Nagpur - 440015
Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888, **Website:** https://www.indcareer.com

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-kumarbharti-part-3-chapter-13-karte-sudharak-karve/

IndCareer

# Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Kumarbharti (Part- 3): Chapter 13- कर्ते सुधारक कर्वे

Class 10: Marathi Kumarbharti Chapter 13 solutions. Complete Class 10 Marathi Kumarbharti Chapter 13 Notes.

## Maharashtra Board Solutions for Class 10- Marathi Kumarbharti (Part- 3): Chapter 13- कर्ते सुधारक कर्वे

Maharashtra Board 10th Marathi Kumarbharti Chapter 13, Class 10 Marathi Kumarbharti Chapter 13 solutions

प्रश्न 1.

खालील आकृत्या पूर्ण करा.




उत्तर:

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-kumarbharti-part-3-chapter-13-karte-sudharak-karve/

(1) महर्षी कर्वे यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य प्रकार
- → राष्ट्रीय स्वातंत्र्य
- → संपूर्ण स्वातंत्र्य

(ii) **महर्षी कर्वे यांचे स्त्री-स्वातंत्र्याबद्दलचे विचार**
- → स्त्रियांना गुलामीतून मुक्त करायचे असेल तर देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.
- → आपण गुलाम आहोत याचे स्त्रीला भान आले पाहिजे.
- → स्त्रीने शिक्षण घेतलेच पाहिजे.
- → शांतपणे, सोशीकपणे व सहिष्णू वृत्तीने स्त्री-शिक्षणाची चळवळ केली पाहिजे.

(iii) महर्षी कर्वे यांची प्रेरणास्थाने
- → पंडिता रमाबाई यांचे जीवनचरित्र
- → ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे जीवनकार्य

प्रश्न **2.**

महर्षी कर्वे यांच्या कार्यकुशलतेचा ओघतक्ता तयार करा.

कार्यात नेमकेपणा होता.

↓

________

↓

________

↓

________

विचार पक्का झाला की

↓

________

↓

________

उत्तर:

कार्यात नेमकेपणा होता.

↓

ते बोलत नसत.

↓

विचार करीत असत.

↓

विचार पक्का झाला की

↓

तो विचार आचरणात आणत.

↓

लोकांना त्यांच्या कृतीतून त्यांचा विचार समजत असे.

प्रश्न 3

हे केव्हा घडेल ते लिहा.

(अ) का सुधारकाने सुरू केलेले कार्य पूर्णत्वास जाईल – ……………………………………..

**(आ)** स्त्री पुरुषांशी स्पर्धा करू शकेल **– ……………………………………..**

उत्तर :

(अ) का सुधारकाने सुरू केलेले कार्य पूर्णत्वास जाईल, जेव्हा पुरुषांचेही 'शिक्षण' होईल.

(आ) स्त्री पुरुषांशी स्पर्धा करू शकेल, जेव्हा ती उच्चविद्याविभूषित होईल.

प्रश्न **4.**

चौकटी पूर्ण करा**.**

(अ) लेखकांच्या मते दुसऱ्याच्या दुःखात दुःखी व सुखात सुखी होणारा – [ ]

(आ) कर्वे यांना लोकमानसाने दिलेली पदवी – [ ]

उत्तर :

(अ) लेखकांच्या मते, दुसऱ्याच्या दुःखात – स्थितप्रज्ञ दुःखी व सुखात सुखी होणारा

(आ) कर्वे यांना लोकमानसाने दिलेली पदवी – महर्षी

प्रश्न **5.**

पाठाच्या आधारे वाक्यांचा उर्वरित भाग लिहून वाक्ये पूर्ण करा**.**

(अ) स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे

(आ) समाजाविरूद्ध विद्रोह केला तर

(इ) लोकांनी कर्वे यांची ससेहोलपट चालवली तरी

उत्तर:

(i) स्त्रीने स्वातंत्र्य कमवावे असे वाटणे म्हणजे खडकावर डोके आपटण्यासारखे आहे.

(ii) समाजाविरुद्ध विद्रोह केला तर विद्रोह करणाऱ्याला समाज गिळून टाकायला येईल.

(iii) लोकांनी कर्वे यांची ससेहोलपट चालवली तरी कर्व्यांनी त्यांना शिव्याशाप दिले नाहीत किंवा आपल्या कार्यापासून कर्वे विचलित झाले नाहीत.

प्रश्न **6.**

'कार्य' या शब्दासाठी पाठात आलेली विशेषणे शोधा**.**

उत्तर:

कार्य या नामाची विशेषणे : मोठे, अतोनात, कठीण, ऐतिहासिक, जटिल, अटीतटीचे, महाकठीण, अलौकिक, महान इत्यादी.

**प्रश्न 7.**

**खालील वाक्यांतील वाक्प्रचार शोधा.**

(अ) शिक्षकांनी सांगितलेली हृदय आठवण आमच्या मनात घर करून राहिली.

(आ) वक्त्याचे विचार अनेकांच्या पचनी पडले नाहीत.

उत्तर:

(अ) मनात घर करून राहणे.

(आ) पचनी न पडणे.

**प्रश्न 8.**

**खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये शोधून लिहा.**

(अ) त्याने लाडू व करंज्या खाल्ल्या.

(आ) पाऊस आला आणि गारा पडल्या.

(इ) तो येणार, कारण त्याला पैशांची गरज आहे.

(ई) आजी म्हणाली, की मी उद्या गावाला जाणार आहे.

उत्तर:

(i) व

(ii) आणि

(iii) कारण

(iv) की.

**प्रश्न 9.**

**केवलप्रयोगी अव्ययांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) …………..! काय सुंदर देखावा आहे हा!

(आ) ………….! असा प्रसंग वैऱ्यावर देखील येऊ नये,

(इ) …………..! तुझी कल्पनाच मुळी मला पसंत नाही.

(ई) …………..! आज तू खूप चांगला खेळलास.

उत्तर:

(i) ओहो! काय सुंदर देखावा आहे हा!

(ii) अरेरे! असा प्रसंग वैऱ्यावर देखील येऊ नये.

(iii) छे! तुझी कल्पनाच मुळी मला पसंत नाही.

(iv) वाहव्वा! आज तू फार चांगला खेळलास.

प्रश्न **10.**

स्वमत**.**

**(अ) '**स्त्रियांनी शिकणे अत्यंत गरजेचे आहे**',** या विधानामागील अण्णांचा दृष्टिकोन स्पष्ट करा**.**

उत्तर :

समाजात स्त्रियांची संख्या पुरुषांइतकीच असते. थोडी कमी-जास्त भरेल. पण साधारणपणे स्त्रिया म्हणजे समाजाचा अर्धा भाग होय. दुर्दैवाने आपल्या समाजाने स्त्रियांना मागासलेले ठेवले. त्यामुळे अर्धा समाज मागासलेला राहिला. त्याचे अनंत तोटे समाजाला आजसुद्धा भोगावे लागत आहेत. बहुतेक वेळा हे नुकसान मोजता येत नाही. मोजता न आल्यामुळे आपले किती नुकसान झालेले आहे, हे कळतही नाही. स्त्रियांना मागासलेले ठेवल्यामुळे समाजाची अर्धी बुद्धिमत्ता निरुपयोगी राहते. त्या बुद्धीचा समाजाला उपयोग झाला असता, पण ती वाया जाते. पुरुष बहुतांश वेळा स्वार्थी व आत्मकेंद्री असतो, स्त्री अधिक सामाजिक असते. यामुळे कुटुंबातला पुरुष शिकला तर कुटुंबातील एका व्यक्तीचा विकास होतो. मात्र स्त्री शिकली तर त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. अखंड कुटुंब शिक्षित होते. आपण हे ओळखले पाहिजे. स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले पाहिजे.

**(आ)** 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' हे वचन महर्षी कर्वे यांच्या जीवनाला कसे लागू पडते, ते स्पष्ट करा**.**

उत्तर :

अण्णासाहेबांनी फार मोठे स्वप्न पाहिले होते. ते फार मोठी ! झेप घेऊ पाहत होते. त्यांच्या स्वप्नाला संपूर्ण समाजाची साथ मिळाली नाही. समाजाने अण्णासाहेबांना ओळखलेच नाही. समाजाने साथ दिली नाहीच; उलट

पराकोटीचा विरोध केला. त्यांचा सतत अपमान केला. त्यांना धक्काबुक्की केली. त्यांचे कपडे फाडले. हे रोज घडत होते. त्यामुळे स्वत:चे कपडे रोज रोज शिवण्याची पाळी त्यांच्यावर येई. स्त्री-शिक्षणासाठी देणग्या गोळा केल्या तर भ्रष्टाचाराचा सतत धाक दाखवला जाई. त्यांच्या चळवळीमुळे कुटुंबीयांनाही त्रास सहन करावा लागे. त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यातही आला होता. हे सर्व यातनामय होते. लोककल्याणासाठी अण्णासाहेबांनी या यातना सहन केल्या. आज आपण अण्णासाहेबांची स्मारके उभारतो. परंतु प्रत्यक्ष जीवनात त्यांना दु:ख, कष्ट आणि यातनाच सहन कराव्या लागल्या. 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' हे तुकाराम महाराजांचे वचन अण्णासाहेबांना तंतोतंत लागू पडते.

**(इ) 'कर्ते सुधारक कर्वे' या पाठातून महर्षी अण्णा कर्वे यांचे तुम्हाला जाणवलेले वेगळेपण, तुमच्या शब्दांत सांगा.**

उत्तर :

अण्णासाहेब कर्वे यांचे फार मोठे वेगळेपण या पाठातून वाचकांसमोर येते, बऱ्याच वेळा सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांना स्वतःच्या सामाजिक कार्याचा गर्व असतो. ती माणसे या गर्वामुळे आक्रमक बनतात, अण्णासाहेबांची प्रकृती याबाबतीत नेमकी उलटी होती. त्यांना प्रचंड आत्मविश्वास होता. पण गर्व नव्हता. ते कधीच आक्रमक बनले नाहीत, उलट ते शांतपणे, कोणावरही न रागावता, आक्रस्ताळेपणा न करता आपले काम करीत. त्यांचे अपमान झाले. अडवणूक झाली. त्यांच्यावर हल्ले झाले. जाता-येता त्यांचे कपडे फाडले गेले. पण ते विचलित झाले नाहीत. घाबरले नाहीत किंवा दु:खी-कष्टीही झाले नाहीत. ते स्थितप्रज्ञाप्रमाणे शांत राहिले. नव्हे ते स्थितप्रज्ञच होते. हा त्यांचा गुण, त्यांचा वेगळेपणा मला खूप भावला आहे. खूप आवडला आहे.

कृति

कृतिपत्रिकेतील प्रश्न १ (अ) आणि (आ) यांसाठी…

उतारा क्र.१

प्रश्न. पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :

कृती १ : (आकलन)

प्रश्न **1.**

कारणे लिहा :

(i) नातेवाईक नसलेले महर्षी कर्वे हे निवर्तल्यानंतर लेखकांच्या आजोबांच्या डोळ्यांत अश्रू आले; कारण –

(ii) अण्णासाहेब कर्वे यांच्या मते, केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळणे उपयोगाचे नव्हते; कारण –

(iii) भारतीय स्त्री स्वत:च आपल्या गुलामीला दागिना मानीत होती; कारण –

उत्तर:

(i) नातेवाईक नसलेले महर्षी कर्वे हे निवर्तल्यानंतर लेखकांच्या आजोबांच्या डोळ्यांत अश्रू आले; कारण महान कार्य केलेले महर्षी कर्वे आपल्यातून गेले याची दु:खद जाणीव आजोबांना झाली.

(ii) अण्णासाहेब कर्वे यांच्या मते, केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळणे उपयोगाचे नव्हते; कारण स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले नाही, तर राष्ट्रीय स्वातंत्र्याला काहीही अर्थ राहत नाही.

(iii) भारतीय स्त्री स्वत:च आपल्या गुलामीला दागिना मानीत होती; कारण तसे मानण्याचे संस्कारच तिच्यावर झाले होते.

प्रश्न **2.**

विसंगती लिहा **:**

(i) अण्णासाहेब कर्वे समाजासाठी कार्य करीत होते, पण समाज ………………………………

(ii) आपल्या समाजात स्त्रीला देवीचे स्थान आहे, असे दाखवले जाते, पण प्रत्यक्षात मात्र ………………………………

(iii) भारतीय स्त्री गुलामीत जगत होती, पण ती ………………………………

उत्तर**:**

(i) अण्णासाहेब कर्वे समाजासाठी कार्य करीत होते, पण समाज त्यांना समाजविरोधक समजत होता.

(ii) आपल्या समाजात स्त्रीला देवीचे स्थान आहे, असे दाखवले जाते, पण प्रत्यक्षात मात्र तिला शूद्रातिशूद्र समजून तिचा प्रच्छन्न छळच केला जाई.

(iii) भारतीय स्त्री गुलामीत जगत होती, पण ती आपल्या गुलामीलाच दागिना समजत होती.

प्रश्न **3.**

माहिती लिहा **:**

(i) अण्णासाहेब कर्वे यांनी घालून दिलेला वस्तुपाठ

(ii) प्रा. अण्णासाहेब कर्वे यांचा कॉलेजात शिकवण्याचा विषय

(iii) त्या वेळच्या अज्ञ समाजाने मानलेले स्वत:चे 'ऐतिहासिक कार्य

(iv) अण्णासाहेबांनी सुरुवातीला स्थापन केलेली संस्था

(v) अनाथ बालिकाश्रमाचे रूपांतर झालेली संस्था

(vi) निधी उभारणीसाठी अण्णासाहेबांनी निर्माण केलेल्या यंत्रणा

उत्तर:

(i) अण्णासाहेब कर्वे यांनी घालून दिलेला वस्तुपाठ – पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी स्वतः विधवेशी विवाह केला.

(ii) प्रा. अण्णासाहेब कर्वे यांचा कॉलेजात शिकवण्याचा विषय – गणित.

(iii) त्या वेळच्या अज्ञ समाजाने मानलेले स्वत:चे 'ऐतिहासिक कार्य' – सत्पुरुषांचा छळ करावा.

(iv) अण्णासाहेबांनी सुरुवातीला स्थापन केलेली संस्था – अनाथ बालिकाश्रम.

(v) अनाथ बालिकाश्रमाचे रूपांतर झालेली संस्था – हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था.

(vi) निधी उभारणीसाठी अण्णा साहेबांनी निर्माण केलेल्या यंत्रणा – 'पै पै चा निधी' आणि 'मुरूड निधी.'

कृती ३ : (व्याकरण)

प्रश्न 1.

कंसांतील सूचनांनुसार उत्तर: लिहा :

(i) सुरुवात त्यांनी स्वत:पासून केली. (अधोरेखित शब्दाच्या जागी 'करतात' हा शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

(ii) त्याच अनपढ राहिल्या तर? (अधोरेखित शब्दाच्या जागी 'तीच' हा शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

(iii) कव्यांच्या पुतळ्याच्या मागे एक मुलगी रडत बसली होती. ('मुलगा' हा शब्द अधोरेखित शब्दाच्या जागी योजा आणि वाक्य पुन्हा लिहा.)

उत्तर:

(i) सुरुवात ते स्वत:पासून करतात.

(ii) तीच अनपढ़ राहिली तर?

(iii) कर्त्यांच्या पुतळ्याच्या मागे एक मुलगा रडत बसला होता.

प्रश्न 2.

अनेकवचन लिहा :

(i) रात्र

(ii) डोळा

(iii) कार्य

(iv) स्त्री

(v) पोथी

(vi) मेढ.

उत्तर:

(i) रात्र – रात्री

(ii) डोळा – डोळे

(iii) कार्य – कार्यें

(iv) स्त्री – स्त्रिया

(v) पोथी – पोथ्या

(vi) मेढ – मेढी.

उतारा क्र. २

प्रश्न. पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :

कृती १: (आकलन)

प्रश्न 1.

आकृती पूर्ण करा :




उत्तर :

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-kumarbharti-part-3-chapter-13-karte-sudharak-karve/




प्रश्न **3.**

चौकटी पूर्ण करा :

(i) कर्वे यांना राजमानसाने दिलेली पदवी

उत्तर :

(i) कर्वे यांना राजमानसाने दिलेली पदवी – भारतरत्न।

कृती २ : **(आकलन)**

प्रश्न **1.**

आकृत्या पूर्ण करा :

https://www.indcareer.com/schools/maharashtra-board-solutions-for-class-10-marathi-kumarbharti-part-3-chapter-13-karte-sudharak-karve/

(i)




(ii)




(iii)




उत्तर:

(i) स्थितप्रज्ञाची लक्षणे
- स्वत:च्या सुखदु:खात अविचल राहतो.
- दुसऱ्याच्या दु:खात दु:खी होतो.
- दुसऱ्याच्या सुखात सुखी होतो.

(ii) चीड आणणारा विरोधाभास
- एकीकडे सरस्वतीला (म्हणजे एका स्त्रीला) वाङ्मयाची जननी मानतो.
- दुसरीकडे स्त्रीला निरक्षर, अज्ञानी ठेवतो.

(iii) स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न
- १९१६ साली भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन केले.
- जगप्रवास करून कर्व्यांनी सर्वत्र शिक्षणाचे महत्त्व बिंबवले.
- जगभर स्त्री-शिक्षणासाठी सभा घेतल्या.

कृती ३ : (व्याकरण)

प्रश्न 1.

पुढील वाक्यातील नामे ओळखा आणि ती मूळ रूपांत लिहा :

महर्षी कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रमा'ची मुहूर्तमेढ रोवली.

उत्तर:

नामे : महर्षी, बालिकाश्रम, मुहूर्तमेढ.

प्रश्न 2.

पुढील वाक्यातील उभयान्वयी अव्यये लिहा :

तिला स्वतंत्र व्हायचे असेल तर तिला भान यावयास हवे, की आपण गुलाम आहोत आणि हे भान शिक्षणाशिवाय येऊ शकत नाही.

उत्तर:

उभयान्वयी अव्यये : तर, की, आणि.

प्रश्न 3.

अधोरेखित शब्दातील प्रत्यय ओळखा आणि तो प्रत्यय जोडलेले अन्य दोन शब्द लिहा :

स्त्रीने शिक्षित झालेच पाहिजे.

उत्तर:

प्रत्यय : इत. अन्य शब्द : प्रमाणित, प्रभावित.

प्रश्न 4.

पुढील शब्दांतून शब्दयोगी अव्यय जोडलेले शब्द ओळखून लिहा :

शिक्षणाशिवाय, विरोधाभास, ऋणातही, व्यक्तीसारखा, अर्धांगवायू, दुसरीकडे, पृथ्वीबाहेर, जगप्रवास, पुरुषप्रधान, स्त्रियांवरील, जन्मलेला.

उत्तर:

शिक्षणाशिवाय, ऋणातही, व्यक्तीसारखा, दुसरीकडे, पृथ्वीबाहेर, स्त्रियांवरील.

व्याकरण व भाषाभ्यास

कृतिपत्रिकेतील प्रश्न ४ (अ) आणि (आ) यांसाठी…

व्याकरण घटकांवर आधारित कृती :

१. समास :

(१) पुढील विग्रहांवरून सामासिक शब्द तयार करा :

(i) खाणे, पिणे वगैरे

(ii) चार कोनांचा समूह

(iii) पास किंवा नापास

(iv) प्रत्येक रस्त्यावर

(v) बाप आणि लेक

(vi) वसतीसाठी गृह.

उत्तर:

विग्रह – सामासिक शब्द

(i) खाणे, पिणे वगैरे – खाणेपिणे

(ii) चार कोनांचा समूह – चौकोन

(iii) पास. किंवा नापास – पासनापास

(iv) प्रत्येक रस्त्यावर – रस्तोरस्ती

(v) बाप आणि लेक – बापलेक

(vi) वसतीसाठी गृह – वसतिगृह

**(२) पुढील तक्ता पूर्ण करा : (सराव कृतिपत्रिका-३)**

समासाचे नाव – उदाहरण – समास विग्रह

(i) समाहार वंद्व समास – केरकचरा – ……………………….

(ii) ………………………. – प्रतिक्षण – प्रत्येक क्षणाला

(iii) द्विगू समास – ………………………. – पाच आरत्यांचा समूह

(iv) विभक्ती तत्पुरुष समास – ………………………. – राजाचा वाडा

**उत्तर:**

समासाचे नाव – उदाहरण – समास विग्रह

(i) समाहार द्वंद्व समास – केरकचरा केर, कचरा वगैरे

(ii) अव्ययीभाव समास – प्रतिक्षण प्रत्येक क्षणाला

(iii) द्विगू समास – पंचारती पाच आरत्यांचा समूह

(iv) विभक्ती तत्पुरुष समास – राजवाडा राजाचा वाडा

२. अलंकार :

पुढील आकृती पाहून अलंकार ओळखा व एक उदाहरण दया :




उत्तर :

अलंकार – [दृष्टान्त]

उदाहरण : लहानपण दे गा देवा। मुंगी साखरेचा रवा।

ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार।।

३. वृत्त:

(१) पुढील ओळीचा लगक्रम लिहा :

प्रभाते मनी राम चिंतीत जावा

उत्तर :

| | | | |
|---|---|---|---|
| प्र भा ते | म नी रा | म चिं ती | त जा वा |
| ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – |

(२) पुढील काव्यपंक्तीतील वृत्त ओळखा : (सराव कृतिपत्रिका-१)

द्रव्यास हे गमन मार्ग यथावकाश

उत्तर:

| द्र व्या स | हे ग म | न मा र्ग | य था व | का श |
|---|---|---|---|---|
| — — ∪ | — ∪ ∪ | ∪ — ∪ | ∪ — ∪ | — — |
| त | भ | ज | ज | ग ग |

वृत्त : हे वसंततिलका वृत्त आहे.

४. शब्दसिद्धी :

(१) पुढील शब्दांना 'इक' हा प्रत्यय लावून शब्द बनवा :

जसे → नगर + इक → नागरिक

(i) समाज → [ ]

(ii) शरीर → [ ]

उत्तर:

(i) [सामाजिक]

(ii) [शारीरिक]

**(२)** परि' हा उपसर्ग लावून दोन शब्द तयार करा **:**

जसे → परि + पूर्ण → परिपूर्ण

(i) क्रमा → [ ]

(ii) श्रम → [ ]

उत्तर:

(i) [परिक्रमा]

(ii) [परिश्रम]

**(३)** 'अडीअडचणी' सारखे पाठातील चार अभ्यस्त शब्द लिहा **:**

उत्तर:

(i) धक्काबुक्की

(ii) हालअपेष्टा

(iii) अटीतटी

(iv) कुरबूर

५. सामान्यरूप :

पुढील तक्ता पूर्ण करा :

शब्द – विभक्ती प्रत्यय – सामान्यरूप

(i) दु:खात – …………………… – ……………………

(ii) कव्यांनी – …………………… – ……………………

(iii) कन्येशी – …………………… – ……………………

(iv) स्वातंत्र्याचा – …………………… – ……………………

उत्तर:

शब्द – विभक्ती प्रत्यय – सामान्यरूप

(i) दु:खात – त – दु:ख

(ii) कव्यांनी – नी – कव्यां

(iii) कन्येशी – शी – कन्ये

(iv) स्वातंत्र्याचा – चा – स्वातंत्र्य

६. वाक्प्रचार :

(१) कंसातील वाक्प्रचारांचा त्या खालील वाक्यांत योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा : (खूणगाठ बांधणे, वस्तुपाठ घालून देणे, मुहूर्तमेढ रोवणे, ससेहोलपट होणे)

(i) रात्रीच्या वेळी रानातला रस्ता शोधता शोधता प्रवाशांना खूप त्रास झाला.

(ii) गाडगेमहाराजांनी स्वच्छता मोहिमेचा पाया घातला,

(iii) अजयने दररोज नियमित व्यायाम करण्याचा मनाशी दृढ निश्चय केला.

(iv) जनसेवा कशी करावी, याचा महात्मा गांधीजींनी आदर्श घालून दिला.

उत्तर:

(i) रात्रीच्या वेळी रानातला रस्ता शोधता शोधता प्रवाशांची ससेहोलपट झाली.

(ii) गाडगेमहाराजांनी स्वच्छता मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली.

(iii) अजयने दररोज नियमित व्यायाम करण्याची मनाशी खूणगाठ बांधली.

(iv) जनसेवा कशी करावी, याचा महात्मा गांधीजींनी वस्तुपाठ घालून दिला.

***(२) पुढील वाक्यांतील वाक्प्रचार शोधा :**

(i) शिक्षकांनी सांगितलेली हृदय आठवण आमच्या मनात घर करून राहिली.

(ii) वक्त्याचे विचार अनेकांच्या पचनी पडले नाहीत.

आभाषिक घटकांवर आधारित कृती :

१. शब्दसंपत्ती :

(१) पुढील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा :

(i) लिहिता-वाचता न येणारा – ………………………

(ii) चांगल्या प्रकारे शिक्षित असलेला – ………………………

(iii) लिहिता-वाचता येणारा – ………………………

(iv) जिचे सौभाग्य हरपले आहे अशी स्त्री – ………………………

(v) केलेले उपकार जाणणारा – ……………………… (मार्च १९)

(vi) कोणाचाही आधार नसलेला – ……………………… (मार्च १९)

उत्तर:

(i) निरक्षर

(ii) सुशिक्षित

(iii) साक्षर

(iv) विधवा

(v) कृतज्ञ

(iv) निराधार.

**(४)** विरुद्धार्थी शब्द लिहा **:**

(i) सहिष्णू x ……………………

(ii) स्वातंत्र्य x ……………………

(iii) सुरुवात x ……………………

(iv) जन्म x ……………………

(v) जमा x ……………………

(vi) सोय x ……………………

(vii) उधळपट्टी x ……………………

(viii) अनाथ x ……………………

उत्तर**:**

(i) सहिष्णू x असहिष्णू

(i) स्वातंत्र्य x पारतंत्र्य

(iii) सुरुवात x शेवट

(iv) जन्म र मृत्यू

(v) जमा x खर्च

(vi) सोय x गैरसोय

(vii) उधळपट्टी x कंजुषी

(viii) अनाथ x सनाथ.

**(५)** गटात न बसणारा शब्द लिहा **:**

(i) आई, वडील, बहीण, बायको, कन्या – ……………………

(ii) मन, तन, चित्त, जिव्हार, अंत:करण – ……………………

उत्तर:

(i) वडील

(ii) तन,

**(६)** दिलेल्या शब्दांतून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा :

(सराव कृतिपत्रिका-३) (नगर व पालिका हे दोन शब्द सोडून)

नगरपालिका → [ ] [ ]

उत्तर :

नगरपालिका – [नग] [नर]

२. लेखननियम :

(१) अचूक शब्द निवडा :

(i) विभूषित/वीभूषित/विभुशित/विभुषीत.

(ii) पुर्नविवाह/पुनर्विवाह/पूर्नवीवाह/पुनर्वीवाह.

(iii) शैक्षणीक शैक्षणिक/शैक्षाणिक/शैक्शणिक.

(iv) सावर्जनिक/सर्वजनिक/सार्वजनीक/सार्वजनिक.

उत्तर:

(i) विभूषित

(ii) पुनर्विवाह

(iii) शैक्षणिक

(iv) सार्वजनिक.

**(२)** पुढील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा :

(i) सरस्वतिला आपन वाङमयाची जननि मानतो.

(ii) एकदा वीदयापिठातल्या कर्त्यांच्या पूतळ्यामागे एक मूलगी रडत बसलि होती.

उत्तर:

(i) सरस्वतीला आपण वाङ्मयाची जननी मानतो.

(ii) एकदा विदयापीठातल्या कर्त्यांच्या पुतळ्यामागे एक मुलगी रडत बसली होती.

३. विरामचिन्हे :

पुढील वाक्यांत योग्य विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा :

(i) तिला म्हटले कर्त्यांच्या पुतळ्यापाशी बसून रडायला तुला काहीच कसे वाटत नाही

(ii) आपण आपल्या आईशी बहिणीशी बायकोशी कन्येशी पुष्कळदा चुकीचे वागतो

उत्तर:

(i) तिला म्हटले, "कर्त्यांच्या पुतळ्यापाशी बसून रडायला तुला काहीच कसे वाटत नाही?"

(ii) आपण आपल्या आईशी, बहिणीशी, बायकोशी, कन्येशी पुष्कळदा चुकीचे वागतो.

४. पारिभाषिक शब्द :

पुढील इंग्रजी पारिभाषिक शब्दांना मराठी प्रतिशब्द लिहा :

(i) Book Stall – ……………………………..

(ii) Book Post – ……………………………..

(iii) Casual Leave – ……………………………..

(iv) No Objection Certificate – ……………………………..

(v) Highway – …………………………….. (सराव कृतिपत्रिका-३)

(vi) Interview – …………………………….. (सराव कृतिपत्रिका-३)

उत्तर:

(i) Book Stall – पुस्तक विक्री केंद्र

(ii) Book Post – पुस्त-प्रेष

(iii) Casual Leave – नैमित्तिक रजा

(iv) No Objection Certificate – ना हरकत प्रमाणपत्र

(v) Highway – महामार्ग

(vi) Interview – मुलाखत.

५. अकारविल्हे/भाषिक खेळ :

**(१)** पुढील शब्द अकारविल्हेनुसार लिहा :

(i) चार → तीन → दोन → एक.

(ii) राग → क्रोध → संताप → चीड.

उत्तर:

(i) एक → चार → तीन → दोन,

(ii) क्रोध → चीड → राग → संताप.

**(२)** आकृती पूर्ण करा:

(i)




उत्तर:



(ii)




उत्तर:




कर्ते सुधारक कर्वे शब्दार्थ

- प्रच्छन्न – गूढ, गुप्त, लपलेला, झाकलेला.
- असिधाराव्रत – तलवारीच्या धारेवरून चालण्याइतके कठीण व्रत.
- पै – पूर्वीचे एक लहान नाणे.
- मैलोन्गणती – अनेक मैल, खूप अंतर.
- मिसाल – प्रतीक.
- राजमानसाने – सरकारने.
- टिचणे – फुटणे, तडकणे.

# Maharashtra Board Solutions Class 10 Marathi Kumarbharti


**Part 1**

- Chapter 1- जय जय हे भारत देशा
- Chapter 2- बोलतो मराठी...
- Chapter 3- आजी : कुटुंबाचं
- Chapter 4- उत्तमलक्षण
- Chapter 5- वसंतहृदय चैत्र
- Chapter 5.1- बालसाहित्यिका : गिरिजा कीर

**Part 2**

- Chapter 6- वस्तू
- Chapter 7- गवताचे पाते
- Chapter 8- वाट पाहताना
- Chapter 9- आश्वासक चित्र
- Chapter 10- आप्पांचे पत्र
- Chapter 10.1- मनक्या पेरेन लागा

**Part 3**

- Chapter 11- गोष्ट अरुणिमाची
- Chapter 12- भरतवाक्य
- Chapter 13- कर्ते सुधारक कर्वे
- Chapter 14- काळे केस
- Chapter 15- खोद आणखी थोडेसे
- Chapter 15.1- वीरांगना

**Part 4**

- Chapter 16- आकाशी झेप घे रे
- Chapter 17- सोनाली
- Chapter 18- निर्णय
- Chapter 19- तू झालास मूक समाजाचा नायक
- Chapter 20- सर्व विश्वचि व्हावे सुखी
- Chapter 20.1- व्युत्पत्ती कोश

## About About Maharashtra State Board (MSBSHSE)

The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or MSBSHSE (Marathi: महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ), is an **autonomous and statutory body established in 1965**. The board was amended in the year 1977 under the provisions of the Maharashtra Act No. 41 of 1965.

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education (MSBSHSE), Pune is an independent body of the Maharashtra Government. There are more than 1.4 million students that appear in the examination every year. The Maha State Board conducts the board examination twice a year. This board conducts the examination for SSC and HSC.

The Maharashtra government established the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, also commonly referred to as Ebalbharati, in 1967 to take up the responsibility of providing quality textbooks to students from all classes studying under the Maharashtra State Board. MSBHSE prepares and updates the curriculum to provide holistic development for students. It is designed to tackle the difficulty in understanding the concepts with simple language with simple illustrations. Every year

around 10 lakh students are enrolled in schools that are affiliated with the Maharashtra State Board.

# FAQs

Where do I get the Maharashtra State Board Books PDF For free download?

You can download the Maharashtra State Board Books from the eBalbharti official website, i.e. cart.ebalbharati.in or from this article.

Add image

How to Download Maharashtra State Board Books?

Students can get the Maharashtra Books for primary, secondary, and senior secondary classes from here. You can view or download the Maharashtra State Board Books from this page or from the official website for free of cost. Students can follow the detailed steps below to visit the official website and download the e-books for all subjects or a specific subject in different mediums.

Step 1: Visit the official website *ebalbharati.in*

Step 2: On the top of the screen, select "Download PDF textbooks"

Step 3: From the "Classes" section, select your class.

Step 4: From "Medium", select the medium suitable to you.

Step 5: All Maharashtra board books for class 11th will now be displayed on the right side.

Step 6: Click on the "Download" option to download the PDF book.

Who developed the Maharashtra State board books?

As of now, the MSCERT and Balbharti are responsible for the syllabus and textbooks of Classes 1 to 8, while Classes 9 and 10 are under the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE).

How many state boards are there in Maharashtra?

The Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, conducts the HSC and SSC Examinations in the state of Maharashtra through its nine Divisional Boards located at Pune, Mumbai, Aurangabad, Nasik, Kolhapur, Amravati, Latur, Nagpur and Ratnagiri.

# About IndCareer

IndCareer.com is a leading developer of online career guidance resources for the Indian marketplace. Established in 2007, IndCareer.com is currently used by over thousands of institutions across India, including schools, employment agencies, libraries, colleges and universities.

IndCareer.com is designed to assist you in making the right career decision - a decision that meets your unique interests and personality.

For any clarifications or questions you can write to **info@indcareer.com**

**Postal Address**

IndCareer.com

52, Shilpa Nagar,

Somalwada

Nagpur - 440015

Maharashtra, India

**WhatsApp:** +91 9561 204 888

**Website:** https://www.indcareer.com